# प्रेसनोट

दि. १७/०१/२०२३

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, भोर येथील पर्यवेक्षिकेवर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | भोर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७. |
| तक्रारदार | महिला, वय - ५४ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – विद्या गजानन सोनवणे, वय ४९ वर्ष, पद – पर्यवेक्षिका (वर्ग-३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प भोर (जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/- रु. (चार हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,०००/- रु. (चार हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- दि. १३/०१/२०२३.

सापळा दिनांक व ठिकाण :- १७/०१/२०२३ रोजी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प भोर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार व लोकसेवक पर्यवेक्षिका विद्या सोनवणे ह्या भोर येथे एकाच कार्यालयात काम करत असून, त्यांच्या कार्यालयाच्या झालेल्या ऑडीटच्या अनुषंगाने ऑडीटर यांना देण्यासाठी पर्यवेक्षिका सोनवणे यांनी ४,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक पर्यवेक्षिका विद्या सोनवणे यांनी ४,०००/- रुपये लाचेची मागणी करुन आज दिनाक १७/०१/२०२३ रोजी ती लाच रक्कम स्वीकारल्यावर त्यांना ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो,पुणे

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.